# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

**(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)**

**मुख्य कार्यालय** : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ०२०-६९०६७९५१
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


जा.क्र.झोपुप्रा/आस्था/३२३५-४/२०२६
दिनांक:- १० / ०७/२०२६

आस्थापना विभाग

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे कार्यालयाचे नव्याने स्थापित अभिलेख कक्ष व संगणक कक्षामधील इंटरनेट जोडणी करिता Telephone व Networking उपकरणे Installation सह तसेच इतर आवश्यक तांत्रिक बाबींचे Installation करण्यासाठी विहित अर्हता धारण करण्याऱ्या अधिकृत पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**Annexure-1**

| Sr.No. | Scope of Work |
|---|---|
| १ | संगणकीय नेटवर्क जोडणी. |
| २ | दूरध्वनी जोडणी. |
| ३ | Cabling work, Installation, commissioning, testing, programming charges and one-year onsite warranty. ३ Months Onsite Support. |

अटी व शर्ती

१) वरील दरपत्रकाची संपूर्ण माहिती http://srapune.gov.in या कार्यालयीन संकेत स्थळावर उपलब्ध असून दि.१८.०७/२०२६ रोजी पासून दरपत्रके भरता येतील.
२) कागदपत्रे सादर करण्यास कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
३) सादर करण्यात येणाऱ्या प्रत्येक कागदपत्रावर आपल्या संस्थेचा शिक्का व स्वाक्षरी करण्यात यावी.
४) लिफाफा-१ ची तपासणी केल्यांनतर पात्र पुरवठादार संस्थेचा लिफाफा-२ उघडण्यात येईल.
५) कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत साहित्य पुरवठा करणे आवश्यक राहील.
६) कोणत्याही प्रकारचे अग्रीम (ॲडव्हान्स) दिला जाणार नाही.
७) देयकातून नियमानुसार शासकीय कर कपात करण्यात येईल.
८) सादर करावयाच्या संगणकीय व Telephone Networking उपकरणाचे दर हे वास्तव, वस्तुनिष्ठ व बाजार किंमतीशी सुसंगत असावेत.

९) संगणकीय व Telephone Networking उपकरण नेमून दिलेल्या ठिकाणी Installation करावे लागेल, तसेच याबाबतचे Installation Report संगणक अधिकारी यांचेकडून प्रमाणित घेणे आवश्यक आहे.

१०) सदर कामाच्या दरपत्रक झोपुप्रा कार्यालयाकडे जमा करण्यापूर्वी प्रत्यक्ष पाहणी करणे व संगणक अधिकारी यांचेशी समन्वय साधणे आवश्यक आहे.

११) तांत्रिक दृष्ट्या केलेला पाहणी अहवाल संगणक अधिकारी यांच्या स्वाक्षरीसह तांत्रिक लिफाफ्यामध्ये जोडणे आवश्यक आहे.

तांत्रिक लिफाफा क्र.१

लिफाफा क्र.१ मध्ये खालील स्वसाक्षांकीत कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१) इसारा रक्कम (EMD) भरण्यातून सूट असल्यास तसे दर्शविणारे संबधित विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (Shop Act) अधिनियम, १९४८ अथवा कंपनी अधिनियम १९५६ नुसार नोंदणी प्रमाणपत्र (नुतनीकरणासह वैध असलेले) सदर नोंदणी प्रमाणपत्रावर व्यवसायाचे स्वरुप निविदेशी सुसंगत असणे बंधनकारक आहे.

३) संस्थेचे/कंपनीच्या नावे असलेले पॅन कार्ड, वस्तु व सेवाकर नोंदणी (GST) प्रमाणपत्र सर्व छायांकित प्रती अपलोड करणे आवश्यक आहे.

४) संस्थेचे/कंपनीच्या नावे असलेले मागील लगतच्या एका वर्षाचे GST भरल्याबाबतचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच माहे मार्च २०२६ पर्यंतचे GST भरल्याबाबतचे GSTR-3B चलानाची प्रत सादर करावी. .

५) संस्थेचे/कंपनीच्या नावे असलेले आर्थिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ चे I.T. Return, Audited Balance sheet जोडणे आवश्यक राहील.

६) संस्थेचे/कंपनीच्या नावे असलेले मागील सलग तीन वर्षाची वार्षीक उलाढाल किमान रु.५० लक्ष असल्याचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र (Last Three Year turnover Rs.५० Lakh)

७) संस्थेचे/कंपनीच्या नावे ISO ९००१:२०१५ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे सोबत छायांकित प्रति जोडावी.

८) संस्थेचे/कंपनीच्या नावे असलेले शासकीय/निमशासकीय कार्यालयास/महामंडळास मागील तीन वर्षातील किमान रु.१० लक्ष पर्यंत पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र सोबत छायांकित प्रति जोडावी.

९) संस्थेचे/कंपनीच्या नावे पुणे शहरामध्ये सर्व्हिस सेटअप असणे आवश्यक आहे. वैध पुरावा (फोटो) लिफाफा-१ मध्ये जोडणे आवश्यक आहे.

१०) शासकीय/निमशासकीय संस्थेच्या काळ्या यादीत समाविष्ट असलेली संस्था/कंपनी सदर दरपत्रक सादर करण्यास पात्र असणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. काळ्या यादीत समाविष्ट नसल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र/स्वघोषणापत्र तसेच निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे खरी असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड/बनावटी कागदपत्रे नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करावे.

दरतक्ता लिफाफा क्र. २

लिफाफा क्र. २ तयार करून स्वसाक्षांकीत कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१) नमूद वस्तूचा एकूण दर GST सह बंद लिफाफा क्र. २ सादर करणे बंधनकारक आहे.

२) ज्या दरपत्रकात निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरांमध्ये संदिग्धता असेल असे दरपत्रक नाकारले जाण्यास पात्र ठरेल. जर अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत असल्यास दोन्हीपैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

३) सादर केलेले दरपत्रक कार्यादेश दिलेल्या दिनांका पासून ०१ महिन्यापर्यंत स्वीकृतीस पात्र राहतील.

करारनामा (Agreement): -

दरपत्रक मंजूर झालेल्या संस्थेला स्वीकृती कार्यादेश प्राप्त झालेनंतर १ महिन्याच्या आत नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक आहे.

वरील स्पेशिफिकेशन व अटी शर्तीप्रमाणे मोहरबंद दरपत्रक झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयात दि.१०/०५/२०२६ ते दि.२०/०५/२०२६ पर्यंत कार्यालयात दु.०३.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.

(सतीशकुमार खडके, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे